dailyloknisht@gmail.com

दैनिक

# लोकनिष्ठ

LOK NISHT

संपादक - युनुस खान

कार्यकारी संपादक - अमजद खान

● दैनिक ● छ.संभाजीनगर ● वर्ष-४ ● अंक - ११९ ● सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ ● पाने - ८ ● किंमत २.०० रू.

RNI - MAHMAR/2023/87332

# संकेतस्थळावर इतिवृत्त प्रसिद्ध न केल्यामुळे कारभारात गैरव्यवहार असण्याची दाट शक्यता?

## वक्फ प्रशासन कारवाई करण्यास असमर्थ!

**छत्रपती संभाजीनगर (दैनिक लोकनिष्ठ – युनूस खान)** – महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या विकासकामांची चर्चा सध्या जोरात सुरु आहे. वक्फ मंडळात गेल्या पांच वर्षात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाल्याचे दावे केले जात आहे. हे दावे किती हि केले गेले तर हे दावे फक्त हे राजकीय घोषणा सारखे स्टंट असल्याचे दिसून येते. वक्फ मंडळात विकासकामे झाल्याचे म्हटले असले तरी किती विकास आणि कोणाचा कसा विकास झाला हे नागरिकांना दिसत असल्याचे त्रस्त नागरिकांचे म्हणणे आहे.२०२३ पासून इतिवृत्त,वार्षिक अहवाल लपविल्या प्रकरणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ प्रशासन आणि अधिकारी– कर्मचारी यांच्या भूमिकेवर हि संशय निर्माण झाले आहे.

वक्फ मंडळाला खरेच नागरिकांना सुविधा पुरवायच्या आहेत का? कि मंत्र्यांची, नेत्यांची खुशमस्करी करायची आहे?असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. वक्फच्या बैठकीत महत्वाच्या निर्णय गुप्तपणे वक्फ मंडळाने घेतल्याचे सांगितले जाते आणि त्यानिर्णयांना सार्वजनिक होऊ देऊ नका असे प्रशासनाला कडक सूचना दिल्या गेल्या होत्या त्यावरून प्रशासन गप्प बसल्याचे बोलले जात आहे. मंडळाच्या इशाऱ्यावर प्रशासनाचा खेळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष केंद्रित केल्यास दृषीयांना जेल वारी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावर काय भूमिका घेतील हे पाहणे महत्वाचे ठरेल...

वक्फ मंडळ आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांमध्ये नाराजगी पसरली आहे. वक्फ मंडळाच्या कामकाजावर व पारदर्शकतेवर प्रश्न चिन्ह निर्माण झालेले आहे. वर्ष २०२३ दिनांक २०/१०/२०२३ पासून सप्टेंबर २०२६ वक्फच्या बैठतीचे इतिवृत्त संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले नाही. बैठकीचे इतिवृत्त संकेतस्थाळावर प्रसिद्ध करण्याची जवाबदारी कोणाची होती.२०२३ साली कार्यरत असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी , वक्फ मंडळाचे अध्यक्ष व सदस्यांना आणि संबंधित विभागातील अधिकारी यांनी याकडे दुर्लक्ष करून आपल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग केल्याचे स्पष्ट दिसून येते. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी सय्यद जुनैद व सहकर्मचारी यांनी कोणाच्या इशाऱ्यावर याकडे दुर्लक्ष करून इतिवृते संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे टाळले याचा खुलासा राज्याच्या जनते समोर करण्याची मागणी नागरिकांनी आमच्याशी बोलतांना केली आहे. इतिवृत्त (मीटिंग चे मिनिट्स) दडपण्यामागचे कारण लवकरच उघड होईल आणि ज्यांनी हे कटकारस्थान रचले त्यांच्यावर कार्यवाहीही अपेक्षित असल्याची माहिती समोर येत आहे.

महाराष्ट्र राज्यातील विविध विभागांमध्ये भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांच्या प्रकरणांवरून अनेकदा लोकप्रतिनिधी (सदस्य) आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जातात. बऱ्याचदा घोटाळे समोर आल्यानंतर राजकीय दबावामुळे किंवा संगनमता मुळे स्थानिक पातळीवर ''शांतता'' किंवा ''गप्प बसण्याची'' भूमिका घेतली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जातो अशीच परिस्थिती वक्फ मंडळात निर्माण झाली असून याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करून पारदर्शकता उघड आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.




डिजिटल कारभार आणि पारदर्शकतेवर भर देणाऱ्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या संकेतस्थळावरील बैठकींच्या इतिवृत्ताबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत यावर दैनिक लोकनिष्ठ यांनी प्रकरण उघड करून राज्याच्या जनते समोर सत्यता मांडली. 'दैनिक लोकनिष्ठ' च्या बातमीने एकीकडे वक्फ बोर्डात घबराटीचे वातावरण असताना, प्रशासनातील अधिकारी मात्र आपल्या कार्यालयांत निवांत गप्पा मारण्यात मग्न आहेत आणि आपल्याविरुद्ध ''काहीही होणार नाही,आम्ही सर्व काही सांभाळून घेऊ,'' अशा शब्दांत चिंता फेटाळून लावत आहेत. आपण 'साहेबाला' इतकी मदत केली आहे, त्यामुळे ते नक्कीच आपल्यालाही मदत करतील, असा ठाम विश्वास अधिकारी कार्यालयात व्यक्त करत आहेत. यामुळे असे दिसून येते कि जे विकासकामे बोर्डात झालेली आहे सर्व काही मंडळ आणि प्रशासनाच्या संगमताने झालेली आहे. संकेतस्थळावर शेवटची प्रसिद्ध इतिवृत्त क्रमांक ७८. दिनांक २०/१०/२०२३ पासून सप्टेंबर २०२६ पर्यंत बैठकीचे इतिवृत्त आणि २०२१ नंतरचे ना हरकत प्रमाणपत्र लीज डीड (भाडेपट्टा करार ) आदेश, वार्षिक अहवाल, ऑडिट रिपोर्ट, लेखापरीक्षण संकेतस्थळावर अपलोड प्रसिद्ध करण्यात आलेले नाही यावर वक्फ सदस्य मूक गिळून गप्प का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मंडळात झालेल्या महत्त्वाच्या सभांचे इतिवृत्त अद्याप संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेले नाही.इतिवृत्त दडपल्या प्रकरणी वक्फ प्रशासनामध्ये अलीकडेच बंद दारांआड आणि दबक्या आवाजात चर्चा केल्याची माहिती मिळाली आहे.वक्फ मंडळाचे सदस्य याबाबत चकार शब्द काढायला तयार नाहित हे राज्याचे खरे दुर्दैव म्हणावे लागेल.

'''तेरी भी चूपमेरी भी चूप'' अशी मंडळ आणि प्रशासन यांची वक्फ मंडळामधील पडद्यामागील छुपी युती जनतेसमोर उघड होत आहे. वक्फ मंडळाच्या कारभारात ढवळाढवळ करीत असून, आमच्या अधिकारावर गदा आणित आहेत. आमचे निर्णय आम्हाला घेऊन देत नाहीत, असा आरोप का केला जात आहे? सूत्रांकडून एक गुप्त भेटीगाठी झाल्याची महत्वाची माहिती मिळाली आहे हे नक्की काय आहे ते कळेलच...! वक्फ मंडळाच्या अध्यक्षांची व सदस्यांची निवड झाली होती त्याला पूर्ण कार्यकाळ मिळाला व गेल्या ५ वर्षात मंडळाच्या अनेक बैठका झाल्याची माहिती आहे, मात्र या बैठकींचे इतिवृत्त संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याने नागरिकांना सभांमध्ये झालेल्या निर्णयांची माहिती मिळत नाही. वक्फ मंडळाच्या बैठकीत विकासकामे, अर्थसंकल्पीय तरतुदी, निधीवाटप, वार्षिक अहवाल, ना हरकत प्रमाणपत्र, लीज डीड, (भाडेपट्टा करार) निविदा तसेच विविध प्रशासकीय विषयांवर निर्णय घेतले जातात. त्यामुळे या निर्णयांची माहिती नागरिकांना सहज उपलब्ध होणे अपेक्षित आहे. मात्र वक्फ मंडळ आणि प्रशासनाने या निर्णयाला जाणूनबुजून लपवून ''दाल मे कुछ काला है या दाल हि काली है '' अशी शंका निर्माण केलेली आहे. वक्फ मंडळाचे अध्यक्ष, सदस्य,वक्फ प्रशासन छुपी युती करून एकमेकाना सावरून घेत करू भ्रष्ट प्रवृत्तींना पाठीशी घालायचे व आपली कामे करून घ्यायची ही कार्यपद्धती ही पद्धत राज्यातील जनता आता ओळखून चुकलेली आहे.

''आंधळ दळतंय व कुत्र पीठ खातयं'' असा कारभार वक्फ मंडळात चालला असताना जनतेने निवडून दिलेले ''कारभारी'' मात्र चिडीचूप का बसले आहेत याचा जनतेनेच विचार करावा .वक्फ मंडळाच्या कारभार अधिक संशयीत होत चालला आहे याचे अनेक उदाहरणे आहेत ज्याचा पर्दाफाश लवकरच होईल. गुप्त बैठकीत जुन्या फाइल्स कशी काय हाताळली गेली,गुप्त भेटीगाठीत काय ठरले आणि काय दडलाय हे जनतेला माहिती व्हावी यासाठी प्रयत्न.

माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ४(१)(ब) नुसार सार्वजनिक प्राधिकरणांनी आपल्या कामकाजासंबंधी महत्त्वाची माहिती स्वयंस्फूर्तीने प्रसिद्ध करण्याची तरतूद आहे. त्यामुळे बैठकींचे इतिवृत्त आणि संबंधित ठराव संकेतस्थळावर नियमितपणे प्रसिद्ध करणे महत्त्वाचे ठरते. दरम्यान, बैठकींचे इतिवृत्त प्रसिद्ध न करण्या मागे नेमके कारण काय, याबाबत राज्य वक्फ मंडळ प्रशासनाकडून अधिकृत स्पष्टीकरण अपेक्षित आहे. सर्व बैठकींचे इतिवृत्त तातडीने संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.यामुळे राज्य वक्फ मंडळाच्या कामकाजातील पारदर्शकता आणि नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. निर्णयांची माहिती वेळेवर उपलब्ध न झाल्यास विकासकामांवरील देखरेख तसेच प्रशासनाच्या कामकाजाची माहिती घेणे नागरिकांसाठी कठीण होत आहे. संकेतस्थळ अद्ययावत ठेवून बैठकींचे इतिवृत्त प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.तीन वर्षात या मुखांना इतिवृत्त संकेतस्थळावर प्रसिद्ध न करण्यामागचे प्रकार काय? कोण कोणते प्रकरण लपविण्याचा खेळासाठी बैठकीचे इतिवृत्त दडपले गेले? वक्फ मंडळाचे विकास झालाय तर ते विकास राज्याला बघू द्या कि, विकास सार्वजनिक प्रसिद्ध करण्यासाठी वक्फचे काही नवीन नियम आहे का? इतिवृत्त दडपल्याप्रकरणी दोषियांवर कारवाही कधी होणार कि हे हि प्रकार दडपले जाणार याचा वक्फ प्रशासनाने खुलासा करावे. प्रशासनाने वेळीच कारवाही केली नाहीस तर शासन समोर प्रकरण मांडले जाणार हे मात्र नक्की...

# रेस्टॉरंट, हॉटेल बस्स झाले, तुकाराम मुंढेंना मुख्यमंत्री कार्यालयाची जबाबदारी द्या, आता इतर विभागांमधील भ्रष्टाचारावर कारवाई करा

**मुंबई** – वरिष्ठ आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाचा कार्यभार स्वीकारल्यापासून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रेस्टॉरंट, हॉटेल आणि इतर आस्थापनांवर सातत्याने कारवाई केली जात आहे. आता शिवसेना (उद्धव) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मुंढे यांना मुख्यमंत्री कार्यालयात महत्त्वाची जबाबदारी देण्याची मागणी केली आहे. राऊत म्हणाले की, रेस्टॉरंट आणि हॉटेलवर पुरेशी कारवाई झाली आहे, आता दुष्काळ, पुनर्वसन, महसूल आणि नगरविकास यांसारख्या विभागांमधील कथित भ्रष्टाचारावर कारवाई करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली पाहिजे. रविवारी पत्रकारांशी बोलताना राऊत म्हणाले की, तुकाराम मुंढे यांना मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रमुख बनवले पाहिजे, जेणेकरून ते सरकारच्या महत्त्वाच्या विभागांच्या कामकाजावर लक्ष ठेवू शकतील.

राऊत म्हणाले की, तुकाराम मुंढे यांची जबाबदारी आता केवळ रेस्टॉरंट आणि हॉटेल्सपुरती मर्यादित राहू नये. ते म्हणाले, ''रेस्टॉरंट आणि हॉटेल्सचा विषय पुरे झाला; लोकांना जेवू द्या.'' राऊत म्हणाले की, मुंढे यांच्यासारख्या कडक अधिकाऱ्याला व्यापक प्रशासकीय जबाबदारी दिल्यास, इतर महत्त्वाच्या सरकारी विभागांमधील नियमांचे उल्लंघन आणि कथित भ्रष्टाचारावरही कारवाई करता येईल. राऊत यांनी विशेषतः दुष्काळ, पुनर्वसन, महसूल आणि नगरविकास विभागांचा उल्लेख केला. त्यांनी आरोप केला की, या विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. ते म्हणाले की, या विभागांमध्ये कारवाई करण्याची जबाबदारी मुंढे यांना देण्यात यावी. राऊत यांनी मुख्यमंत्री कार्यालयाच्या भूमिकेचाही उल्लेख करत म्हटले की, मुंढे यांना मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रमुख बनवले पाहिजे. त्यांच्या मते, यामुळे त्यांना विविध महत्त्वाच्या सरकारी विभागांच्या कामकाजावर लक्ष ठेवता येईल आणि प्रशासनात नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी कारवाई करता येईल.

संजय राऊत यांनी मुंबईत माध्यमांशी संवाद साधला. यावेळी आयएएस तुकाराम मुंढे यांच्यावर भाष्य करण्यासहित विविध राजकीय घडामोडींवर भाष्य केले. निवडणूक आयोगावर संजय राऊत म्हणाले, 'मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना एक्स्पोज केल आहे. ते भाजपाला लाभ होईल, असे काम करत आहेत. ही स्वातंत्र्याची गळचेपी आहे. महाराष्ट्रामध्ये २ कोटी नावे वगळलेली आहे. ही भूमिका घातक आहे. मुख्य आंदोलनाची सुरुवात मुंबईमधून होत आहे. दिपके यांनी जरी हाक दिली असली, तरी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात चर्चा झाली, ते ४ तारखेला स्वतंत्र मोर्चा काढणार आहेत.. २ तारखेला अभिजीत दिपके यांचा जो मोर्चा असेल, त्यांना शिवसेनेचा पाठिंबा आहे. कोब्रोच जनता पार्टी राजकीय पक्ष नाही. ज्या राजकीय पक्षांना त्रास झाला आहे. त्या सगळ्या पक्षांनी एकत्रित येऊन आंदोलन केले पाहिजे.४ तारखेला होणारा मोर्चा मोठा मोर्चा असेल..

एसआयआर प्रक्रियेवर संजय राऊत म्हणाले, 'राहुल गांधी यांनी देखील या मुद्द्यावर चर्चा केली आहे. या सगळ्या संस्था, मोदी



आणि अमित शहा यांच्या घरचे घरगडी आहे. हे दबावाखाली, प्रलोभनाच्या खाली आहेत. मोदी आणि शहा यांना जे हवेय, ते करण्यासाठी लोकशाहीची हत्या करत आहे. यातील मुख्य आरोपी ज्ञानेश कुमार आहेत. आम्ही कोर्टात गेलो, याचिका केली आहे, यातील निर्णय कोर्टाला घ्यावा लागेल. काँग्रेसने आम्ही इंडिया आघाडी सोबत आहोत हे लक्षात घ्यावे. दरवेळी काँग्रेसने वेगळी भूमिका मांडली नाही पाहिजे. ममता बॅनर्जी यांना इंडिया आघाडीचे महत्व आता पटत आहे. ही चांगली गोष्ट आहे. ही वेळ आहे दिल्लीच्या सैतानाला मारायची. यासाठी सगळ्यांनी एकत्र आले पाहिजे. आम्ही राहुल गांधींचं केंद्रीय नेतृत्व मानतो. तर त्यांनी देखील विचार करावा'. राम मंदिर देणगी चोरी प्रकरणावरुन राऊतांनी सरकावर टीका केली. 'चंपत राय यांच्यामुळे तिजोरी लुटली गेली. हे भाजपचे लोक आहेत, या सगळ्या गोष्टी आम्ही आधीपासून सांगत आलो आहे. एसआयटीने चोरी झाल्याचे सांगितले आहे. पण आमच्या मुख्यमंत्र्यांना दिसत नाही'. दुष्काळावर राऊत म्हणाले, 'मागच्या २४ तासात ७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे, पण मदत काही पोहोचली नाही. सगळे लोक वेगळे बोलत आहेत. हे मुख्यमंत्र्यांचे अपयश आहे. ५५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे'.

**दुष्काळाचे खाते मुंढेंकडे द्या, संजय राऊतच्या मागणीवर भुजबळ यांची प्रतिक्रिया...**

महाराष्ट्रातील काही तालुक्यात दुष्काळ घोषित केला आहे. यावर मंत्री छगन भुजबळांनी प्रतिक्रिया दिली आहे. मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, पहिली फेरी झालेली आहे. आणखीन काही लोक मागण्या घेऊन पुढे येतील. आमचे गाव याच्यातून सुटलेला आहे किंवा तालुका सुटलेला आहे. त्या संदर्भामध्ये पुन्हा चौकशी करून ती सुद्धा गाव याच्यामध्ये घेण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जाणार आहेत. हा पहिला भाग झाला. दुसरे जे आहेत त्यांना सुद्धा न्याय दिला जाईल, असे त्यांनी सांगितले आहे. मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी जे भाष्य केले त्यावर मी कमेंट करू शकत नाही. काँग्रेस मोर्चाबाबत मला काही कल्पना नाही. ते का असे बोलतात मला कल्पना नाही. दुष्काळ आणि पुनर्वसन खाते तुकाराम मुंढेंकडे द्या, असे खासदार संजय राऊत म्हणाले आहेत. यावर भुजबळांनी सांगितले की, ठीक आहे त्याचे ते मत आहे. माझे मत मात्र हेच आहे. तुकाराम मुंढेंकडे दिलेले खाते जे आहे ते अतिशय महत्त्वाचे खाते आहे. दुष्काळाचे पैसे देणे घेणे हे होऊ शकते. परंतु नाही त्या गोष्टी आम्हाला खायला घातल्या हॉटेल रेस्टॉरंट मधून किंवा इतर ठिकाणाहून. पनीर दुधाच्या बाबतीम ध्ये, औषधाच्या बाबतीमध्ये. कित्येक पटीने औषधे महाग केली जातात.

अरुण भाटिया, महेश झगडे दोघा तिघांनी काम करण्याचा प्रयत्न केला. अनेक त्यामध्ये राजकारण सुद्धा घुसले. पुढे ते काही काम जाऊ शकले नाही. यावेळी तुकाराम मुंढे यांना सर्व सपोर्ट करता जे दुकानांमध्ये रेस्टॉरंट मध्ये आपल्याला चकाचक दिसत आहे. तेथे वाढलेले पदार्थ आत मध्ये कुठल्या परिस्थितीमध्ये तयार केले. किती उंदीर, झुरळ येथे आहे. किती मिक्सिंग तिकडे आहे. याचे काही माहीत नसते. अनेक लोक रोगाला बळी पडतात. सगळ्यात महत्त्वाचे खाते हेच आहे असे मला वाटते, असे छगन भुजबळांनी सांगितले आहे. विखे पाटलांवर बोलताना ते म्हणाले की, लिविंग रिलेशनशिप काय म्हणतात बिन लग्नाची सुद्धा राहतात. यात विशेष काय महत्त्वाचे आहे. त्यांचे म्हणण्याचे उद्देश असे आहे. लग्नांमध्ये जास्त खर्च करू नका. विशेषतः दुष्काळ वगैरे अशी परिस्थिती त्यावेळी समजून घेतले पाहिजे, असे भुजबळांनी सांगितले. मुख्य निवडणूक आयोगाविरोधात ठाकरे बंधू चार तारखेला मोर्चा काढणार आहेत. यावर छगन भुजबळांनी निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे कामच आहे. आंदोलन करणे, धरणे धरणे, मोर्चे काढणे विरोधी पक्षाचे कामच आहे ना.

दुष्काळ जाहीर झाल्यानंतर तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. यावर बोलताना ते म्हणाले की, त्या आत्महत्या का व्हाव्या ते काही सांगता येत नाही. आपण कर्जमुक्ती सुरू केली आहे. त्यानंतर दुष्काळ जाहीर केला. वेगवेगळ्या प्रकारच्या सवलती आपण शेतकऱ्यांना देणार आहोत. या सुद्धा का झाल्या याचा तपास करावा लागेल, असे त्यांनी सांगितले. ग्रंथालय कंत्राट लाच प्रकरणी ते म्हणाले की, ठीक आहे चांगली गोष्ट आहे. देर है मगर अंधेर नही. अन्नपुरवठा विभागाकडून शेतकऱ्यांना मदत करणार का यावर छगन भुजबळ म्हणाले की, जवळपास सरसकट करणार. नुसते हिरवे दिसतेय, ज्याचे कंस आहे त्याला दाणे नाही. अनेक ठिकाणी दुबार पेरणी करण्याचे आता वेळ आली आहे. शेतकरी अडचणीमध्ये आहे हे खरंच आहे. आणखीन काही गावे यामध्ये वाढतील असे मला वाटते. मुलांच्या परीक्षेमध्ये काही सूट देणार आहे. आणखीन दहा–बारा गोष्टी त्यामध्ये मदत करण्याचे ठरवले आहे. आणखीन काही रक्कम घ्यायची असेल तर त्या सर्व गोष्टीचा आढावा घेऊन करू. एक तर अहिल्याबाई होळकर कर्जमुक्ती योजना सुरू आहे. एकूण किती लोक यामध्ये आहे शेतकरी त्याला आपण किती जास्तीत जास्त पैसे देऊ शकतो. त्याचा अभ्यास करावा लागेल की नाही. दिवाळीच्या आत सर्व काम पूर्ण करू. जी काही मदत करायची ती करू.

ते पुढे म्हणाले की, काही गरीब माणस आहेत त्यांना आम्ही फुकट अन्न धान्य देतोच. त्याचा आम्ही सतत आढावा घेतोय. काही लोक प्राधान्य क्रमांकमध्ये येतात ते अन्नधान्य घेतात. परंतु सहा महिने ज्यांनी घेतलेले नाही आहे. याचा अर्थात त्यांना गरज नाही. असे कार्ड आम्ही रद्द करतो. ज्यांना खरोखर गरज आहे प्राधान्य क्रम ांकांमध्ये बसत आहेत. त्यांना मी ते वाटप करतो. परंतु कोरोना काळामध्ये सुद्धा प्रत्येक खेड्यामध्ये हजार लोकांना आपण गहू तांदूळ डबल दिला. कुठेही मागे पडलेलो नाही. एक सुद्धा गरजू व्यक्ती जो आहे. अन्नधान्य वाचून मागे राहणार नाही.

# प्रेमानंद महाराजांच्या शिष्याच्या आश्रमात संशयास्पद मृत्यूमागील गूढ कायम!

**जबलपूर –** मध्य प्रदेशातील जबलपूरचे रहिवासी आणि वृंदावनमधील संत प्रेमानंद महाराजांचे शिष्य रसिक दुलारी शरण उर्फ दीपक लोधी यांच्या मृत्यूचे प्रकरण अधिकाधिक गूढ बनत चालले आहे. शुक्रवारी सकाळी सुमारे साडेदहा वाजता वृंदावनच्या वराहघाट भागातील गुरु कृपा कुंज आश्रमाच्या चार मजली इमारतीवरून पडून त्यांचा मृत्यू झाला. सुरुवातीला, हे कारण पडणे किंवा आत्महत्या असल्याचे मानले जात आहे. मात्र, कुटुंब हे स्वीकारण्यास तयार नाही. संपूर्ण प्रकरणाच्या निष्पक्ष आणि निःपक्षपाती तपासासाठी कुटुंबाने सीबीआय चौकशीची मागणी केली आहे.

खरं तर, २७ वर्षीय शिष्य रसिक दुलारी शरण, उर्फ दीपक लोधी पटेल, मूळचा जबलपूरच्या संस्कारधनी जिल्ह्यातील नर्मदा बस्ती परसवाडा गावचा होता. भारतीय सैन्यात भरती होऊन देशाची सेवा करण्याचे त्याचे स्वप्न होते. त्याने अनेक स्पर्धा परीक्षा दिल्या आणि सैन्य भरतीसाठी शारीरिक चाचणीही दिली. मात्र, शर्यतीत अपात्र ठरल्याने सरकारी नोकरीत जाण्याचे त्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही. त्याच्या कुटुंबीयांच्या मते, महाविद्यालयीन काळात त्याची धार्मिक आवड वाढू लागली, कारण त्याचे लक्ष अभ्यासापेक्षा ईश्वरभक्तीवर अधिक केंद्रित होते. हळूहळू, त्याचे मन सांसारिक जीवनापासून दूर होऊन भक्ती आणि अध्यात्माकडे वळू लागले.

दीपकच्या कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, त्याने जबलपूरमध्ये दादा गुरूंच्या मार्गदर्शनाखाली जवळपास तीन हजार किलोमीटर चालत नर्मदा परिक्रमा केली होती. यानंतर त्याचा अध्यात्म आणि भक्तीकडे असलेला कल वाढला. २०२४ मध्ये, त्याने वृंदावनमध्ये संत प्रेमानंद महाराजांकडून दीक्षा घेतली आणि त्यानंतर आपले नाव बदलून रसिक दुलारी शरण असे ठेवले. दीक्षा घेतल्यापासून तो वृंदावनमध्येच राहत होता. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, आपल्या भक्ती आणि उपासनेत कोणताही व्यत्यय येऊ नये म्हणून रसिक दुलारी शरणने फोनचा वापरही बंद केला होता.

कुटुंबाने अनेकदा वृंदावनला भेट दिली, पण त्यांना दीपकला भेटता आले नाही. आता त्याच्या मृत्यूच्या बातमीने कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे. कुटुंबाच्या म्हणण्यानुसार, दीपक वृंदावनला भेट देऊन एकदा जबलपूरला परतला होता. मात्र, सुमारे दोन वर्षांपूर्वी तो वृंदावनला परतल्यानंतर कधीच घरी परतला नाही आणि हळूहळू त्याचा कुटुंबाशी संपर्क कमी झाला. कुटुंबाच्या म्हणण्यानुसार, दीपकला विजेचे काम येत होते, म्हणूनच त्याला आश्रमात विजेचे काम देण्यात आले होते. तीन महिन्यांपूर्वी त्याला गुरु कृपा कुंजच्या चौथ्या मजल्यावर राहण्यासाठी एक खोली देण्यात आली होती. शुक्रवारी सकाळी सुमारे साडेदहा वाजता दीपक आश्रमाच्या चार मजली इमारतीच्या सर्वात वरच्या मजल्यावरून खाली पडला. त्याला गंभीर अवस्थेत एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आले, जिथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पोलिसांच्या प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, आश्रमात आणि आजूबाजूला लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये तो वरच्या मजल्यावरून पडल्याचे दृश्य कैद झाले आहे. मात्र, त्याने हे टोकाचे पाऊल उचलण्यामागील कारण अद्याप अस्पष्ट आहे.



दीपकच्या खोलीत पोलिसांना रक्ताने माखलेला ग्राइंडर सापडल्याने हे प्रकरण संशयास्पद मानले जात आहे. त्याच्या गुप्तांगांनाही गंभीर दुखापत झाली होती. या जखमा त्याने स्वतः करून घेतल्या होत्या की यात त्याचा कोणी दुसरा सहभाग होता, याचाही पोलीस तपास करत आहेत. पोलिसांनी घटनास्थळावरून एक मोबाईल फोन, डायरी आणि इतर वस्तू जप्त केल्या आहेत. ग्राइंडरदेखील तपासणीसाठी जतन करून ठेवण्यात आला आहे. पोलिसांचे म्हणणे आहे की, शवविच्छेदन अहवाल आणि न्यायवैद्यक तपासणीनंतरच जखमा आणि मृत्यूच्या परिस्थितीबद्दल अधिक स्पष्टता येईल.

**कुटुंबातील सदस्यांचे गंभीर आरोप –** दीपकच्या कुटुंबीयांना त्याच्या मृत्यूची बातमी फोनवरून कळवण्यात आली. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला त्यांना फक्त एवढेच सांगण्यात आले होते की, दीपकची प्रकृती बरी नाही आणि त्याने वृंदावनला यावे. आपल्या मुलाच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी या आशेने, कुटुंबीय जबलपूरहून वृंदावनला रवाना झाले. दीपकचा धाकटा भाऊ, मनीष पटेल याने सांगितले की, त्याच्या कुटुंबात त्याची आई लाँग बाई, वडील चेतन पटेल, एक मोठी बहीण आणि दोन भाऊ आहेत. मनीषच्या मते, दीपक एक हुशार विद्यार्थी होता आणि त्याने महाविद्यालयीन शिक्षण घेतले होते. त्याला लहानपणापासूनच धार्मिक आवड होती आणि याच आवडीमुळे त्याने नर्मदा परिक्रमा केली आणि नंतर तो वृंदावनला गेला.

मनीष सांगतात की, दीपक एकदा वृंदावनहून जबलपूरला परत आला होता, पण सुमारे दोन वर्षांपूर्वी वृंदावनला परतल्यानंतर तो पुन्हा कधीच परतला नाही. त्याचा त्याच्या कुटुंबाशी असलेला संपर्क हळूहळू कमी झाला. दीपकची आई, लाँग बाई, यांनी सांगितले की त्या गेल्या वर्षी आपल्या मुलाला भेटायला वृंदावनला आल्या होत्या. त्या आश्रमात न राहता दुसऱ्या ठिकाणी राहिल्या. वृंदावनमधील त्यांच्या पाच दिवसांच्या मुक्कामादरम्यान, दीपकने त्यांना मथुरा आणि वृंदावनची सफर घडवली होती. कुटुंबाचा आरोप आहे की, दीपकच्या दीक्षेनंतर त्याच्याशी थेट संपर्क साधणे कठीण झाले. जेव्हा जेव्हा कुटुंब त्याला भेटायला वृंदावनला जायचे, तेव्हा त्यांना थांबायला सांगितले जायचे. कुटुंबाचा दावा आहे की, तासन्तास, कधीकधी तर दिवसभर वाट पाहूनही त्यांना दीपकला भेटता आले नाही. कुटुंबाचे म्हणणे आहे की, गेल्या दोन वर्षांपासून दीपकसोबतचा त्यांचा संवाद अत्यंत मर्यादित झाला आहे. देवाची उपासना करण्यासाठी घर सोडून गेलेला त्यांचा मुलगा कुटुंबापासून इतका दुरावला, असे काय घडले असावे, असा प्रश्न कुटुंब विचारत आहे.

दीपकचे मेहुणे, सोनू पटेल यांनी आश्रम व्यवस्थापनावर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या दाव्यानुसार, घटनेची माहिती मिळाल्यानंतर कुटुंब वृंदावनला आले. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास आश्रमात पोहोचल्यावर त्यांना बराच वेळ थांबवून ठेवण्यात आले. सोनू पटेल यांच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला कुटुंबाला सांगण्यात आले की, दीपक कोसळला असून रुग्णालयात त्याच्यावर शस्त्रक्रिया सुरू आहे. कुटुंबाचा आरोप आहे की, रात्री ९ वाजेपर्यंत त्यांना दीपकला भेटू दिले नाही. नंतर, शवविच्छेदनगृहात मृतदेह पाहिल्यावर आई आणि बहीण अतिशय ढसाढसा रडल्या. कुटुंबाचा असाही आरोप आहे की, एवढ्या गंभीर घटनेनंतर त्यांना मदत करण्यासाठी आश्रमातून कोणताही प्रतिनिधी रुग्णालयात किंवा शवविच्छेदन गृहात पोहोचला नाही. कुटुंबाने या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. दीपक उर्फ रसिक दुलारी शरणच्या मृत्यूच्या प्रकरणात सध्या सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, चार मजली इमारतीवरून पडणे ही आत्महत्या होती, अपघात होता की आणखी काही वेगळे कारण होते.

संपूर्ण घटनेच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये ती वरच्या मजल्यावरून पडताना दिसत असली तरी, घटनेपूर्वी तिच्यासोबत काय घडले? रक्ताने माखलेला ग्राइंडर खोलीत कसा पोहोचला? तिला गंभीर दुखापत कशी झाली? या प्रश्नांची उत्तरे पोलीस तपासात मिळणे बाकी आहे. पोलिसांनी तपासात तिचा मोबाईल फोन, डायरी, ग्राइंडर आणि सीसीटीव्ही फुटेजचा समावेश केला आहे. शवविच्छेदन अहवाल, न्यायवैद्यक तपासणी आणि इतर पुराव्यांच्या आधारे मृत्यूचे नेमके कारण समोर येण्याची शक्यता आहे. वृंदावन पोलीस आश्रमाची इमारत आणि आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत आहेत. कोतवाली प्रभारी अश्विनी कुमार यांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास केला जात आहे.

**सीबीआय चौकशीची मागणी –** रसिक दुलारी शरणने आत्महत्येसारखे पाऊल का उचलले असेल, हे त्यांना समजत नसल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. काहीतरी अनुचित घटना घडल्याची भीती कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे. मृत्यूच्या परिस्थितीबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले जात असून, या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी कुटुंबीयांनी सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. मृत्यूची बातमी मिळाल्यानंतर कुटुंबीय जबलपूरहून वृंदावनला पोहोचले आहेत. वडील चेतराम पटेल आणि आजोबा प्रेमलाल लोधी यांनी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. रसिक दुलारी शरणचा मृत्यू कोणत्या परिस्थितीत झाला, हे केवळ चौकशीनंतरच स्पष्ट होईल, असे कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

एकीकडे जबलपूरमधील एक कुटुंब आहे, ज्यांचा मुलगा सुमारे दोन वर्षांपूर्वी ईश्वरभक्तीसाठी घर आणि कुटुंब सोडून ७०० किलोमीटरचा प्रवास करून वृंदावनला गेला, जिथे दीक्षा घेतल्यानंतर तो रसिक दुलारी शरण यांचा भक्त झाला. दुसरीकडे, त्या शिष्याच्या मृत्यूने अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवले आहेत. कुटुंबाला आपल्या मुलाच्या मृत्यूमागील सत्य जाणून घ्यायचे आहे आणि या प्रकरणाचा निकाल पोलिसांच्या तपासावर अवलंबून असेल. सध्या, कुटुंब सीबीआय चौकशीची मागणी करत आहे.

## संपादकीय

# संयुक्त राष्ट्रांना बदलाची गरज!

संयुक्त राष्ट्रांच्या परिणामकारकतेवर, विशेषतः युद्ध आणि शांततेच्या बाबतीत, वाढत्या प्रमाणात प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. ओआरएफ अमेरिकाचे कार्यकारी संचालक ध्रुव जयशंकर यांनी सांगितले की, अनेक संस्था अजूनही महत्त्वाच्या आहेत. त्यांनी सार्वजनिक आरोग्य आणि विकासाच्या क्षेत्रातील संयुक्त राष्ट्रांच्या कार्याचे उदाहरण दिले. पश्चिम आशिया आणि युक्रेनमधील सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांच्या प्रासंगिकतेबद्दल जयशंकर म्हणाले की, संयुक्त राष्ट्रांच्या परिणामकारकतेवर, विशेषतः युद्ध आणि शांततेच्या बाबतीत, वाढत्या प्रमाणात प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. आपण अशा टप्प्यावर आहोत, जिथे हे स्पष्ट झाले आहे की केवळ संयुक्त राष्ट्रच नव्हे, तर इतर विद्यमान बहुपक्षीय संस्थादेखील आपली उपयुक्तता आणि परिणामकारकता गमावू लागल्या आहेत. या संस्था आजही अनेक कारणांसाठी महत्त्वाच्या आहेत आणि त्यांनी चांगली कामे केल्याची अनेक उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ, जगभरात सार्वजनिक आरोग्य योजना विकसित करणे आणि विविध हितधारकांना एकत्र आणणाऱ्या संयुक्त राष्ट्र महासभेत लैंगिक समानतेला विषय बनवणे. आज संयुक्त राष्ट्रांमध्ये काम करणारे लोकसुद्धा त्याच्या परिणामकारकतेबद्दल मोठ्या प्रमाणावर साशंक आहेत. ओआरएफ अमेरिकाचे कार्यकारी संचालक यांनीही सांगितले की, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सुधारणा अजून खूप दूर आहे. चीनची अनिच्छा, सुधारणेसाठीचे विविध प्रस्ताव आणि आफ्रिकन देशांमधील एकमताचा अभाव हे भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या प्रयत्नांमधील प्रमुख अडथळे आहेत. हे न घडण्याची अनेक कारणे आहेत. यापैकी एक कारण म्हणजे सुरक्षा परिषदेचे काही स्थायी सदस्य, विशेषतः चीन, या सुधारणेसाठी उत्सुक नाहीत. या मुद्यावर फ्रान्स सर्वात सक्रिय देशांपैकी एक राहिला आहे, तर अमेरिकेची भूमिका 'बऱ्यापैकी संदिग्ध राहिली आहे. पाकिस्तानसह आणखी एक गट सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यांची संख्या वाढवण्याच्या कोणत्याही प्रस्तावाला रोखण्याचा प्रयत्न करत आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत १५ सदस्य देश आहेत. यामध्ये नकाराधिकार असलेले पाच स्थायी सदस्य आणि दोन वर्षांच्या कालावधीसाठी निवडले जाणारे १० अस्थायी सदस्य यांचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे पाच स्थायी सदस्य चीन, फ्रान्स, रशियन फेडरेशन, युनायटेड किंगडम आणि अमेरिका हे आहेत. जग बदलत असताना संयुक्त राष्ट्रांच्या रचनेतही बदल होणे गरजेचे आहे. युद्ध आणि शांततेच्या प्रश्नांवर प्रभावी निर्णय घेता येत नसतील, तर या संस्थेच्या अस्तित्वाचा उद्देशच कमकुवत होतो. भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशाला सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी स्थान मिळणे ही केवळ भारताची मागणी नाही, तर बदलत्या जागतिक वास्तवाची गरज आहे. मात्र, काही देशांच्या राजकीय स्वार्थामुळे सुधारणा रखडत असतील तर संयुक्त राष्ट्रांची विश्वासार्हता आणखी कमी होईल. त्यामुळे जुन्या समीकरणांना चिकटून न राहता अधिक प्रतिनिधित्व, पारदर्शकता आणि प्रभावी निर्णयक्षमता यासाठी संयुक्त राष्ट्रांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. जगाला आज निष्प्रभ संस्था नव्हे, तर संकटाच्या काळात ठाम निर्णय घेणारे प्रभावी संयुक्त राष्ट्र हवे आहे.

# ज्ञानेश कुमार नंतर त्यांची कन्या मेधा रूपमही वादाच्या भोवऱ्यात,

## ज्ञानेश कुमारांचा पाय आणखी खोलात जाण्याची चिन्हे?

**नवी दिल्ली** – मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या मनमानी कारभाराची बातमी द इंडियन एक्सप्रेसने दिल्यानंतर त्याविरोधात बरीच राळ उडत आहे. ज्ञानेश कुमार यांच्या थेट राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. त्याचवेळी त्यांची कन्या आणि नोएडाच्या जिल्हाधिकारी मेधा रूपम यादेखील एका नव्या वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका आदेशाविरोधात मेधा रूपम यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या 'लिस्टिंग'च्या पद्धतीवर वकिलांच्या एका संघटनेने थेट सरन्यायाधीशांकडे आक्षेप नोंदवला आहे.



ठरवून दिलेल्या रोस्टरचे उल्लंघन करून हे प्रकरण एका विशिष्ट खंडपीठाकडे सोपवण्यात आल्याचा आणि सुनावणीदरम्यान थेट प्रसारणाचा आवाज म्यूट (बंद) करण्यात आल्याचा गंभीर आरोप या संघटनेने केला आहे. 'लॉयर्स असोसिएशन फॉर कॉन्स्टिट्यूशन' या वकिलांच्या संघटनेने या संदर्भात सरन्यायाधीश सूर्य कांत यांना पत्र पाठवले आहे. मेधा रूपम यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी का घेण्यात आली? असा सवाल या पत्रातून उपस्थित करण्यात आला आहे. 'लाइव्ह लॉ'च्या वृत्तानुसार, १३ जुलै २०२६ पासून लागू असलेल्या अधिकृत रोस्टरनुसार नोएडातील कामगार आंदोलनाशी संबंधित प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेची प्रकरणे न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाकडे प्रलंबित होती.

मेधा रूपम या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कन्या असल्याचा विशेष उल्लेख करत संघटनेने म्हटले आहे की, वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांशी संबंधित प्रकरणांना अशी विशेष वागणूक दिल्यास चुकीचा पायंडा पडू शकतो. एका विशिष्ट खंडपीठापुढे अशी विशेष सुनावणी निश्चित केल्याने न्यायालयीन प्रक्रियेवरील जनतेच्या विश्वासाला तडे जातात, असा आक्षेप या पत्रात घेण्यात आला आहे. सुनावणीदरम्यान व्हिडीओ कॉन्फरन्सिंगचा आवाज म्यूट करण्याच्या निर्णयावरही संघटनेने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. २३ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मेधा रूपम यांच्या बाजूने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, तर उत्तर प्रदेश सरकारच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ मुकुल रोहतगी उपस्थित होते. मात्र या सुनावणीदरम्यान अचानक थेट प्रसारणाचा ऑडिओ बंद करण्यात आला होता.

**नेमके प्रकरण काय?**

टाइम्स नाऊने दिलेल्या वृत्तानुसार, हे संपूर्ण प्रकरण नोएडातील एका कामगार आंदोलनादरम्यान दिल्ली विद्यापीठाची विद्यार्थिनी आणि कार्यकर्ती आकृती चौधरी हिच्यावर लावण्यात आलेल्या राष्ट्रीय सुरक्षा कायद्याशी संबंधित आहे. २ सप्टेंबर रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने आकृती चौधरी हिची स्थानबद्धता रद्द केली होती. तसेच तिला ५ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश देत, ही रक्कम मेधा रूपम आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतनातून वसूल करावी, असे स्पष्ट निर्देश दिले होते. याशिवाय उच्च न्यायालयाने नोएडा प्रशासनावर कडक ताशेरे ओढले होते.

उच्च न्यायालयाच्या या आदेशाविरोधात मेधा रूपम यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या संपूर्ण आदेशाला स्थगिती दिली होती. मात्र, नंतर आदेशात सुधारणा करत स्पष्ट केले की, ही स्थगिती केवळ मेधा रूपम यांच्यावरील ताशेरे आणि त्यांच्या पगारातून ५ लाख रुपयांची भरपाई वसूल करण्याच्या निर्देशांपुरतीच मर्यादित राहील. आकृती चौधरी हिची एनएसए अंतर्गत झालेली स्थानबद्धता रद्द करण्याचा उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. दरम्यान या घडामोडींवर कॉंग्रेस जनता पार्टीचे प्रवक्ते सौरव दास यांनी प्रतिक्रिया नोंदवली. त्यांनी 'एक्स'वर एक पोस्ट करत या प्रकरणाची तुलना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयोगाशी संबंधित सुरू असलेल्या व्यापक वादाशी केली.

**एसआयआरशी संबंधित निर्णयांवर निवडणूक आयोगामध्ये मतभेद...!**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेशी संबंधित बाबींमध्ये आपल्या वैधानिक जबाबदाऱ्यांचे कथित उल्लंघन केल्याप्रकरणी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. ही याचिका वकील शैलेंद्र मणी त्रिपाठी यांनी वकील चांद कुरेशी यांच्यामार्फत दाखल केली आहे. दरम्यान, मतदार याद्यांच्या एसआयआरशी संबंधित निर्णयांवर निवडणूक आयोगामध्ये मतभेद असल्याच्या माध्यमांतील वृत्तामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

निर्णय घटनाबाह्य व अवैध घोषित करण्याची मागणी :या याचिकेत ज्ञानेश कुमार यांनी कथितरित्या दोन्ही निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्या संमतीशिवाय घेतलेले निर्णय, जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे आणि केलेले सॉफ्टवेअर बदल घटनाबाह्य व अवैध घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे. पुढे याचिकेत म्हटले आहे की, २३ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या कागदोपत्री नोंदींनुसार, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील भारतीय निवडणूक आयोगातील अभूतपूर्व घटनात्मक त्रुटी आणि बेकायदेशीरपणा उघड झाला आहे. याचबरोबर, या अधिकृत फायलींमधून हे उघड होतं की, १० महिन्यांच्या कालावधीत (नोव्हेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६) उर्वरित दोन निवडणूक आयुक्तांनी आयोगाच्या नावानं घेतलेल्या आणि अंमलात आणलेल्या एकतर्फी, अनधिकृत आणि बेकायदेशीर निर्णयांविरुद्ध किमान १४ वेगवेगळ्या प्रसंगी (एकाच दिवसात चार वेळा) अधिकृत लेखी मतभेद आणि आक्षेप नोंदवले, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

एसआयआरशी संबंधित असे सर्व निर्णय अवैध घोषित करावेत आणि मूळ फॉर्म ६ पुन्हा लागू करावा. याव्यतिरिक्त, एसआयआर प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून अंदाजे १३ कोटी मतदार वगळल्याच्या कथित प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याची विनंती याचिकेत करण्यात आली आहे. तसेच, याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, गोव्यातील ९७ सत्यापित नागरिकांना मतदानाचा हक्क हेतुपुरस्सर नाकारणे, पश्चिम बंगालमध्ये १६.१० लाख बनावट अपीलांची बनावट निर्मिती आणि त्यांना अधिकृत मान्यता देणे, आणि फॉर्म ६ मध्ये बेकायदेशीरपणे फेरफार करणे, ही कलम ३२ अंतर्गत शासकीय कर्तव्याचे थेट, दखलपात्र उल्लंघन आहे.

संबंधित सरकारी अधिकाऱ्यांवर तत्काळ खटला चालवण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली आहे. याचिकाकर्त्याने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, उप निवडणूक आयुक्त मनीष गर्ग आणि निवडणूक आयोगाच्या आयटी प्रमुख सीमा खन्ना यांच्यावर फौजदारी कारवाईची मागणी केली आहे. तसंच याचिकेत असा आरोप आहे की, या अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधित्व कायद्यांतर्गत त्यांच्या वैधानिक जबाबदाऱ्यांचे उल्लंघन केले आहे. दरम्यान, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांनी एसआयआर शी संबंधित निर्णय आणि आदेशांवर किमान १४ वेळा आक्षेप घेतला होता, असे दोन दिवसांपूर्वी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात ही याचिका दाखल करण्यात आली. या वृत्ताचा हवाला देत याचिकेत म्हटले आहे की, तीन सदस्यीय निवडणूक आयोगाने एसआयआरशी संबंधित निर्णयांवर वारंवार मतभेद दर्शवले होते.

# आदिवासी विभागाकडून लष्करी शाळांना देण्यात येणाऱ्या अनुदानातील घोटाळ्याची चौकशीचे आदेश

**छत्रपती संभाजीनगर** – छत्रपती संभाजीनगर, लातूर आणि बीड जिल्ह्यांतील चार लष्करी शाळांना वितरित केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या देखभाल अनुदानातील कथित घोटाळ्याची चौकशी करण्याचे आदेश आदिवासी विकास विभागाने दिले आहेत. आवश्यक मान्यता नसलेल्या इयत्ता अकरावी आणि बारावीसाठी अनुदान कथितरित्या वितरित करण्यात आले. ही कथित अनियमितता २०१५–१६ ते २०२२–२३ या कालावधीत घडली. उच्च न्यायालयाचे वकील आणि आदिवासी हक्क कार्यकर्ते प्रशांत बोडखे यांच्या तक्रारीनंतर, अमरावती आदिवासी विभागाचे अतिरिक्त आयुक्त संदीप गोलैत यांनी २५ सप्टेंबर रोजी चौकशीचे आदेश दिले. बोडखे यांनी दावा केला आहे की, हा कथित घोटाळा किमान २ कोटी रुपयांचा असू शकतो.

''वरवर पाहता, हा सुमारे २ कोटी रुपयांचा घोटाळा असल्याचे दिसते. जर सखोल आणि निष्पक्ष चौकशी झाली, तर ही रक्कम मोठ्या प्रमाणात वाढू शकते,'' असे बोडखे यांनी टीओआयला सांगितले. त्यांनी असा आरोप केला की, चारही शाळांना केवळ इयत्ता दहावीपर्यंतच मान्यता असूनही, इयत्ता अकरावी आणि बारावीसाठी अनुदान मंजूर करण्यात आले. यापैकी दोन शाळा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात, तर प्रत्येकी एक शाळा लातूर आणि बीडमध्ये आहे. गोलैत यांनी छत्रपती संभाजीनगर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या (आयटीडीपी) प्रकल्प अधिकाऱ्याला चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

अधिकाऱ्याला वस्तुनिष्ठ, वर्षनिहाय अहवाल सादर करण्यास आणि आरोपांवर स्पष्ट मत देण्यास सांगितले आहे. विभागाने २०१५–




१६ ते २०२६–२७ पर्यंतची कागदपत्रे मागवली आहेत. यामध्ये प्रत्येक शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, योजनेअंतर्गत समाविष्ट असलेले विद्यार्थी, प्रति विद्यार्थी मंजूर अनुदान आणि प्रत्यक्षात अदा केलेली रक्कम यांचा समावेश आहे. ज्या आधारे अनुदान वितरित करण्यात आले, त्या शालेय विभागांचे मान्यता आदेश, विद्यार्थी वाटप आदेश आणि वर्षनिहाय तपासणी अहवाल सादर करण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

बोडखे यांच्या तक्रारीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची आणि कथितरित्या अनियमितपणे वितरित केलेल्या अनुदानाची वसुली करण्याची मागणी करण्यात आली आहे. यामध्ये तत्कालीन प्रकल्प अधिकारी, सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), योजना हाताळणारे लिपिक, सहायक लेखा अधिकारी आणि इतरांना कथितरित्या जबाबदार धरण्यात आले आहे. चौकशीचे आदेश देऊन कारवाई सुरू न केल्यास २८ सप्टेंबरपासून अमरावतीतील अतिरिक्त आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर अनिश्चित काळासाठी आंदोलन करण्याचा इशारा बोडखे यांनी दिला होता. त्यांनी आता महाराष्ट्रातील इतर लष्करी शाळांना मिळणाऱ्या अनुदानाचीही छाननी करण्याची मागणी केली आहे . ''महाराष्ट्रातील इतर लष्करी शाळांचीही अशाच प्रकारे तपासणी आणि लेखापरीक्षण केल्यास असाच प्रकार उघडकीस येऊ शकतो,'' असे बोडखे म्हणाले.

इतर शाळांना वितरित केलेल्या अनुदानाचा तपशील मिळवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले, जेणेकरून अशाच प्रकारच्या अनियमितता आढळल्यास कायदेशीर कारवाई करता येईल. छत्रपती संभाजीनगर येथील आयटीडीपी कार्यालयात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि लातूर जिल्ह्यांचा समावेश आहे. चार लष्करी शाळा त्याच्या अखत्यारीत येतात.

# बाळूमामा देवस्थान ट्रस्टमध्ये ६० कोटी ७४ लाख रुपयांचा गैरव्यवहार,५ जणांना अटक, मुख्य संशयित अद्याप फरार!

**कोल्हापूर** – आदमापूर येथील श्री संत सद्गुरु बाळूमामा देवस्थान ट्रस्टमधील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणाला आता वेग आला आहे. लेखापरीक्षणात तब्बल ६० कोटी ७४ लाख रुपयांचा आर्थिक अपहार झाल्याचे समोर आल्यानंतर कोल्हापूर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने कारवाई सुरू केली आहे. या प्रकरणात निढोरी आणि मुरगूड परिसरातील पाच जणांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, मुख्य संशयित तत्कालीन प्रशासक रागिणी खडके व तत्कालीन सचिव रावसाहेब कोणकेरी पसार असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

जमीन खरेदी–विक्रीच्या व्यवहारात गैरव्यवहार केल्याच्या आरोपावरून भीष्म सूर्यवंशी, रणजित सूर्यवंशी, प्रकाश मांगले, सागर शिंदे आणि तन्मय बाचणकर यांना पोलिसांनी अटक केली आहे.या कारवाईमुळे बाळूमामा देवस्थान ट्रस्टमधील आर्थिक व्यवहारांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. दरम्यान,या प्रकरणातील तत्कालीन कार्याध्यक्षा रागिणी खडके आणि सचिव रावसाहेब कोणकेरी यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, न्यायालयाने ३१ ऑगस्ट रोजी त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. त्यानंतर या प्रकरणातील तपासाला अधिक गती मिळण्याची शक्यता आहे. लेखापरीक्षणादरम्यान ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आल्याचे समोर आले आहे.

विशेषतः जमीन खरेदी–विक्रीशी संबंधित व्यवहारांची चौकशी पोलिसांकडून केली जात आहे. ट्रस्टच्या निधीचा वापर,




व्यवहारांची कागदपत्रे आणि संबंधित व्यक्तींची भूमिका याबाबत आर्थिक गुन्हे शाखेकडून तपास सुरू आहे.या प्रकरणातील मुख्य आरोपी रागिणी खडके आणि काही ट्रस्टी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नसून ते फरार असल्याची माहिती आहे. त्यामुळे त्यांच्या शोधासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. ट्रस्टमधील गैरव्यवहाराची व्याप्ती व गुन्ह्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे. मेंढी विक्री व्यवहार, महाप्रसाद, देणगीची रक्कम, जमिनींची खरेदी–विक्री, त्यातून झालेल्या गैरव्यवहारांची चौकशी झाली आहे. ट्रस्टमध्ये २०२० ते २०२६ या कालावधीत झालेल्या सर्व संशयास्पद व्यवहारांची चौकशी करण्यात आली आहे.

आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासातून ट्रस्टमधील कथित गैरव्यवहाराचे नेमके स्वरूप, त्यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का आणि आर्थिक व्यवहारांमध्ये कोणत्या पद्धतीने अनियमितता झाली, याबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. या प्रकरणाकडे भाविकांसह स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे. पथकाने गेल्या महिनाभरात केलेल्या कागदपत्रांच्या तपासणीत या पाचही जणांची नावे ११ कोटींच्या जमीन घोटाळ्यात समोर आली. त्यानुसार बुधवारी रात्री पोलिस उपअधीक्षक सुवर्णा पत्की–कवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार तुकाराम माने, अजित मुजुमदार, संतोष पाटील, हौसिंग पाटील, रवींद्र पाटील यांनी पाच जणांना मुरगुड, निढोरी परिसरात जेरबंद केले.देवस्थान परिसरात पार्किंगसाठी जागा कमी पडू लागल्याने काही स्थानिकांकडून जागांची खरेदी केली होती. पण, अवघ्या काही दिवसांपूर्वीच या जागा मूळ मालकांकडून काही एजंटांनी कमी दरात घेतल्या होत्या. देवस्थानला जमिनी विकताना तब्बल ११ कोटी रुपयांचा फायदा मिळवला असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

# ६२० पैकी १५० उसनवारीवरील अधिकारी अजूनही मंत्र्यांकडे तळ ठोकून मंत्रालयातच..

**मुंबई** – तोंडी आणि उसनवारी तत्त्वावर मंत्र्यांकडे कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुळ विभागात पाठविण्याच्या मुख्य सचिवांच्या आदेशाला महिना लोटल्यानंतरही एक तृतीयांश अधिकारी अजूनही सबंधित मंत्र्याकडे तळ ठोकून बसल्याचे आढळून आले आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याकडील कर्मचाऱ्यांना रिक्त जागांवर समायोजित करण्याची मागणी केली आहे.

उसनवारी पद्धतीने आणि तोंडी आदेशाने मंत्री आस्थापनेला चिकटून बसलेल्या अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या नेमणुका रद्द करण्याबाबत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी २५ ऑगस्ट रोजी आदेश काढले होते. त्यानुसार विविध मंत्र्यांकडे उसनवारीवर काम करणाऱ्या ६२० अधिकारी– कर्मचाऱ्यांपैकी जवळपास १५० अधिकारी कर्मचारी अजूनही मंत्र्यांकडे कार्यरत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

विशेष म्हणजे काही बहुतांश मंत्र्यांनी आपल्याकडील कर्मचारी कमी केले असले तरी अजूनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयासाठी ७२ पदे मंजूर असून त्यांच्याकडे ३० अतिरिक्त कर्मचारी कार्यरत असून यातील एकही कर्मचारी सोडण्यास शिंदे यांच्या कार्यालयाने नकार दिल्याचे समजते. उपमुख्यमंत्री कार्यालयासाठी मंजूर पदांपैकी १८ पदे रिक्त असून त्यावर पदांवर या अधिकाऱ्यांना समायोजित करण्याची मागणी उपमुख्यमंत्री कार्यालयाने केली आहे. त्यानुसार धोरणात बसणाऱ्या अधिकाऱ्यांचे समोयोजन केले जाणार असून अन्य कर्मचाऱ्यांना परत पाठवावे लागणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या कार्यालयात केवळ दोन अतिरिक्त कर्मचारी आढळून आले.विशेष म्हणजे आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांच्या कार्यालयासाठी १६ पदांची मंजूरी असताना तेथे तब्बल ७० अधिकारी– कर्मचारी उसनवारीवर काम करीत असल्याचे आढळून आले असून त्यांना परत पाठविण्यात आल्याचेही सूत्रांनी सांगितले.

# निवडणूक आयोगामध्ये मतभेद :

# एसआयआर वरील मतभेदांच्या वृत्तांनंतर स्पष्टीकरण

## संधू आणि जोशी यांना ईसीआयनेट, मतदार यादीबाबत चिंता का होती?

**नवी दिल्ली** – शनिवारी तिन्ही आयुक्तांच्या बैठकीनंतर निवडणूक आयोगाने ईसीआयनेट च्या तज्ज्ञ पुनरावलोकनाचे आदेश दिले आहेत. तसेच, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी कॅबिनेट सचिव टी. व्ही. सोमनाथन यांना स्वतंत्रपणे पत्र का लिहिले, यावरही स्पष्टीकरण दिले आहे. निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, त्यांची पत्रे प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्याच्या कामकाजाशी संबंधित होती आणि ती निवडणूक आयोगाच्या धोरणात्मक निर्णयाबद्दल नव्हती.

इंडियन एक्सप्रेसच्या एका तपासानंतर हे स्पष्टीकरण देण्यात आले आहे, ज्यामध्ये तीन सदस्यीय निवडणूक आयोगामध्ये मतदार यादी व्यवस्थापन, ईसीआयनेट आणि विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) शी संबंधित निर्णयांवरून मतभेद असल्याचे वृत्त देण्यात आले होते.

अहवालानुसार, निवडणूक आयोगाने कामाचे वाटप बदलल्यानंतर संधू आणि जोशी यांनी कॅबिनेट सचिवांना स्वतंत्रपणे पत्र लिहिले. अहवालानुसार, या बदलांमुळे मतदार याद्या व्यवस्थापित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या आयटी प्रणालींच्या देखरेखीवर परिणाम होत असल्याची चिंता त्या दोन आयुक्तांना होती.

निवडणूक आयोगाने घडलेल्या प्रकाराची वेगळीच माहिती दिली. आयोगाने म्हटले की, ही पत्रे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या एका अधिकाऱ्याच्या कामकाजाशी संबंधित होती आणि त्यांचा आयोगाच्या किंवा त्याच्या आयटी विभागाच्या धोरणात्मक बाबींशी संबंध नव्हता.

निवडणूक आयोगाने असेही म्हटले आहे की, ''दोन आयुक्तांच्या आदेशानंतर संबंधित अधिकाऱ्याने जारी केलेल्या कामाच्या पुनर्वितरणाचे आदेश प्रत्यक्षात लागू झाले नाहीत आणि डीईसीद्वारे आयटी विभागावरील देखरेख कधीही मागे घेण्यात आली नाही.'' क्षेत्रीय अधिकाऱ्यांना त्यांच्या वैधानिक अधिकारांनुसार भूमिकेवर आधारित ईसीआयनेट प्रणालीमध्ये प्रवेश आहे. वरिष्ठ उप निवडणूक आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील आणि आयटी / मधील एका स्वतंत्र तज्ज्ञाचा समावेश असलेली एक समिती ईसीआयनेट चे पुनरावलोकन करेल, जेणेकरून ते कायद्यांच्या आणि नियमांच्या तरतुदींचे पालन करते की नाही हे पुन्हा तपासले जाईल आणि आयोगाला अहवाल सादर केला जाईल,'' असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

संधू आणि जोशी यांनी मतदार यादीतील माहिती आणि ती कशी हाताळली जात आहे याबद्दल चिंता व्यक्त केल्यानंतर, या निर्णयामुळे ईसीआयनेट च्या प्रवेशाच्या मुद्द्याला औपचारिक पुनरावलोकन प्रक्रिया मिळते.




निवडणूक आयोगाचे ४० हून अधिक ॲप्लिकेशन्स आणि पोर्टल्स एकत्र आणणारे एकच व्यासपीठ म्हणून ईसीआयनेट २२ जानेवारी रोजी सुरू करण्यात आले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी याच्या शुभारंभावेळी सांगितले की, हे व्यासपीठ कायद्यानुसार तयार करण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञान महासंचालक सीमा खन्ना म्हणाल्या की, यामुळे ''पारदर्शकता, विश्वासार्हता आणि जनतेचा विश्वास वाढेल''.

इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, जोशी यांनी यापूर्वीच 'मतदार यादी डेटाबेसच्या टप्प्याटप्प्याने होणाऱ्या केंद्रीकरणा'बद्दल इशारा दिला होता. मतदार डेटाबेसमध्ये बदल करण्याची परवानगी देणारी क्रेडेन्शियल्स केवळ संबंधित वैधानिक प्राधिकरणांकडेच उपलब्ध आहेत की नाही, हे तपासण्यासाठी बाहेरील आयआयटी तज्ज्ञाच्या सहभागाने ऑडिट करण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला होता.

नंतर संधू यांनी चिंता व्यक्त केली की, राज्य निवडणूक अधिकाऱ्यांना मतदार यादी प्रणालीमध्ये ''योग्य आणि संपूर्ण प्रवेश'' नव्हता. मतदार याद्या तयार करण्याची आणि अद्ययावत करण्याची कायदेशीर जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांना उपलब्ध असलेल्या प्रवेशावरील निर्बंधांवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, ही प्रणाली वेगळ्या पद्धतीने काम करते. निवडणूक आयोगाच्या मते, बूथ लेव्हल ऑफिसर, असिस्टंट इलेक्टोरल रजिस्ट्रेशन ऑफिसर, इलेक्टोरल रजिस्ट्रेशन ऑफिसर, डिस्ट्रिक्ट इलेक्शन ऑफिसर आणि चीफ इलेक्टोरल ऑफिसर हे आपापल्या आयडी आणि पासवर्डद्वारे आपापली वैधानिक कर्तव्ये पार पाडतात.

''निवडणूक आयुक्त च्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यासह, इतर कोणीही ईसीआयनेट वर त्यांचे वैधानिक कार्य पार पाडू शकत नाही,'' असे निवडणूक आयोगाच्या एका अधिकाऱ्याने या आठवड्याच्या सुरुवातीला सांगितले. शनिवारच्या निर्णयामुळे भविष्यातील तंत्रज्ञान प्रकल्पांसाठीच्या अंतर्गत प्रक्रियेतही बदल झाला आहे. आयोगाने म्हटले आहे की, नवीन आयटी मॉड्यूल्स आणि पोर्टल्स मंजुरीसाठी आयोगासमोर ठेवण्यापूर्वी, प्रथम त्यांच्या अधिकारी समितीमध्ये त्यावर चर्चा केली जाईल.

राज्यांमधील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या सूचनांच्या आधारे ईसीआयनेट मध्ये आधीच बदल करण्यात आले आहेत, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

''क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आणखी लवचिकतेची आवश्यकता भासल्यास, ती कार्यान्वित केली जाईल. यापुढे आयटी मॉड्यूल्स आणि पोर्टल्ससंबंधीच्या सर्व नवीन उपक्रमांवर आयोगाकडून मंजुरी मिळण्यापूर्वी अधिकारी समितीमध्ये (सीओओ) चर्चा केली जाईल,'' असे त्यात म्हटले आहे. 'द इंडियन एक्सप्रेस'ने असे वृत्त दिले होते की, संधू आणि जोशी यांनी गेल्या १० महिन्यांत मतदार याद्या आणि एसआयआर शी संबंधित निर्णयांवर आणि आदेशांवर किमान १४ वेळा आक्षेप नोंदवले होते. या वृत्तानंतर ही बैठक झाली. वृत्तपत्राने म्हटले आहे की, काही आक्षेप मतदार नोंदणी, नावे वगळणे आणि पुनर्संचयित करणे, फॉर्म ६ आणि मतदार यादी डेटाबेसमध्ये प्रवेश यांसारख्या बाबींशी संबंधित होते.

निवडणूक आयोगाने शनिवारी सांगितले की, एसआयआरच्या देशव्यापी अंमलबजावणीसह त्यासंबंधीच्या निर्णयांना तिन्ही आयुक्तांची ''सर्वानुमते मंजुरी'' मिळाली आहे. शनिवारच्या बैठकीला मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, संधू आणि जोशी उपस्थित होते.

मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवेच्या अटी आणि कार्यकाळ) अधिनियम, २०२३ च्या कलम १८ अन्वये, आयोगाचे कामकाज शक्यतोवर एकमताने चालवले जावे. जेव्हा आयुक्तांमध्ये एखाद्या विषयावर मतभेद असतील, तेव्हा बहुमताच्या मतानुसार निर्णय घेतला जाईल. काही मतदारांसाठी एसआयआर प्रक्रिया बदलली. ज्या मतदारांचे मॅपिंग झालेले नाही किंवा ज्यांच्या बाबतीत सिस्टीमच्या भाषेत तार्किक विसंगती आहे, अशा मतदारांना एसआयआर दरम्यान नोटिसा मिळतात, त्यांच्यावर परिणाम करणारे बदलही आयोगाने जाहीर केले.

अशा मतदारांना सहसा मतदार नोंदणी अधिकाऱ्याच्या कार्यालयात व्यक्तिशः हजर राहावे लागणार नाही. त्याऐवजी, बूथ स्तरावरील अधिकारी त्यांच्या घरी भेट देतील, आवश्यक कागदपत्रे गोळा करतील आणि ती ईसीआयनेट वर अपलोड करतील. त्यानंतर ईआरओ त्या कागदपत्रांच्या आधारे प्रकरणावर निर्णय घेऊ शकतात.

आयोगाने दिल्लीत दावे आणि आक्षेप दाखल करण्याची मुदत ३० ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे. शनिवारच्या निर्णयानुसार, निवडणूक आयोग आता एका बाहेरील तांत्रिक तज्ज्ञाचा समावेश असलेल्या समितीमार्फत ईसीआयनेट प्रणालीचा आढावा घेईल, तर भविष्यातील आयटी प्रकल्प तीन सदस्यीय आयोगाकडे पोहोचण्यापूर्वी अंतर्गत छाननीच्या आणखी एका स्तरावरून जातील.






# ज्ञानेश कुमारांविरोधात रस्त्यावरची लढाई सुरु, दिल्लीपासून आसामपर्यंत देशव्यापी एल्गार

**नवी दिल्ली/मुंबई –** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेसने देशव्यापी आंदोलन केले. उत्तराखंडमधील डेहराडूनमध्ये कार्यकर्त्यांनी बॅरिकेड्सवर भेदण्याचा प्रयत्न केला. पाटण्यात पोलिसांनी आंदोलकांवर पाण्याचे फवारे मारले. दुसरीकडे, कॉकरोच जनता पक्षाने जर ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिला नाही, तर ते २ ऑक्टोबरपासून देशव्यापी आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. सीजेपीने ज्ञानेश कुमार यांना ४८ तासांची मुदत दिली होती.

एसआयआर संदर्भात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेत एसआयआरचे निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे आणि सॉफ्टवेअरमधील बदल घटनाबाह्य घोषित करण्याची आणि सुमारे १३ कोटी मतदारांची नावे वगळल्याबद्दल एसआयटी चौकशीचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली आहे. काँग्रेसने ज्ञानेश कुमार निवडणूक आयोगामध्ये मनमानीपणे वागत असल्याचे म्हटलं आहे. इतर दोन आयुक्तांचे म्हणणे ऐकत नाहीत. इंडियन एक्सप्रेसमधील एका वृत्तानुसार, गेल्या १० महिन्यांत दोन्ही निवडणूक आयुक्तांनी आयोगाच्या निर्णयांवर १४ वेळा आक्षेप नोंदवला आहे. या वृत्तानंतर पक्षाने हे आरोप केले आहेत. दरम्यान, महाराष्ट्राच्या एसआयआरविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांमध्ये एसआयआरची घटनात्मक वैधता, प्रक्रिया आणि अंमलबजावणीच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. याचिकाकर्त्यांचा दावा आहे की, दोन निवडणूक आयुक्तांचा आक्षेप असूनही मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी एसआयआरशी संबंधित १४ आदेश जारी केले. त्यांनी हे आदेश रद्द करण्याची आणि आक्षेप जाहीर करण्याची मागणी केली आहे.

दुसरीकडे, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार उपस्थित राहणार असलेले उत्तर प्रदेशातील दोन कार्यक्रम निवडणूक आयोगाने पुढे ढकलले आहेत. पहिला कार्यक्रम २५ सप्टेंबर रोजी मेरठमध्ये आणि दुसरा २५ सप्टेंबर रोजी वाराणसीमध्ये होणार होता. निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, २१ सप्टेंबर रोजी दोन्ही कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले होते आणि त्यांचा सध्याच्या वादाशी काहीही संबंध नाही. 'द इंडियन एक्सप्रेस'मधील २३ सप्टेंबरच्या वृत्तानुसार, दोन निवडणूक आयुक्तांनी गेल्या १० महिन्यांत एसआयआर संदर्भात किमान १४ लेखी आक्षेप दाखल केले आहेत. यापैकी चार आक्षेप एकाच दिवशी घेण्यात आले होते. दोन निवडणूक आयुक्तांनी थेट कॅबिनेट सचिवांचा दरवाजा ठोठावला होता. मात्र, निवडणूक आयोगाने मखलाशी म्हटले आहे की, असे आक्षेप सामान्य प्रक्रियेचा भाग आहेत आणि एसआयआरसह सर्व अंतिम निर्णय एकमताने घेतले जातात.

**जंतर मंतर २.० लवकरच सुरु होणार?** निवडणूक आयोग आणि एसआयआर बाबत झालेल्या सनसनाटी खुलाशानंतर आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांविरोधात देशव्यापी संतापाचा उद्रेक झाला आहे. आज काँग्रेसकडून देशव्यापी आंदोलन करण्यात आल्यानंतर ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन कडून जंतर मंतरवर ज्ञानेश कुमारांच्या अटकेच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. मात्र, या आंदोलनातून दिल्ली पोलिसांनी अनेकांना फरफटत नेत अटक केली आहे. राजकीय विश्लेषक योगेंद्र यादव यांच्यासह नेहा बोरा यांनाही पोलिसांना ताब्यात घेत जंतर मंतर बंद केले आहे.




ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन च्या नेतृत्वाखालील आंदोलनात मोठ्या संख्येने लोक जमले. दिल्ली पोलीसांकडून योगेंद्र यादव यांच्यासह ४० हून अधिक आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. प्रशांत भूषण, अंजली भारद्वाज आणि नेहा यांच्यासह विद्यार्थी आंदोलनासाठी जंतर मंतर येथे पोहोचले होते. दिल्ली पोलिसांनी त्यांना बॅरिकेड्सवर रोखले. दिल्ली पोलिसांनी जंतर मंतर येथे सर्व आंदोलकांना अटक करून संपूर्ण रस्ता मोकळा केला. त्यांना आंदोलनाच्या ठिकाणी जाऊ दिले नाही. त्यांना १५० मीटर अंतरावर थांबवून अटक करण्यात आली आणि तेथून परत पाठवण्यात आले.

यापूर्वी, ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनने शुक्रवारी दिल्लीतील जंतर मंतर येथे आंदोलन करत जाहीर सभा घेतली. त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेबद्दल मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अटकेची मागणी केली. आयोजकांनी सांगितले की, 'द इंडियन एक्सप्रेस'च्या अलीकडील एका वृत्तामुळे भारतीय निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर गंभीर प्रश्नचिन्हे निर्माण झाले आहेत. या आंदोलनात 'आयसा'च्या अध्यक्षा नेहा योगेंद्र यादव, आरजेडी खासदार मनोज झा, सीपीआयएमएल लिबरेशनचे दिपांकर भट्टाचार्य, वकील प्रशांत भूषण, अंजली भारद्वाज आणि नंदिता नारायण यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि प्रमुख व्यक्ती सहभागी झाले होते.

**संपूर्ण एसआयआर प्रक्रिया रद्द करा – राज ठाकरे –** निवडणूक आयोगातील मतभेद एका इंग्रजी वृत्तपत्राने समोर आल्यानंतर राज्यातील विरोधी पक्षांनी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनीही ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी निवडणूक आयोगाची स्वायत्तता आणि विश्वासर्हता घालवल्याचं म्हटले. तसेच, ज्ञानेशकुमार यांनी ४८ तासांत राजीनामा द्यावा, अन्यथा देशव्यापी आंदोलन उभे करण्याची घोषणाच सीजेपीने केली आहे. आता, मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही ट्विटरच्या माध्यमातून ज्ञानेशकुमारांवर टीका करत, नुकतीच झालेली एसआयआर प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केली.

''ज्ञानेश्वरांनी रेड्याकडून वेद वदवले होते. आता सत्तेतले रेडे या ज्ञानेशाकडून आपले वेद (?) वदवतायंत. असो, गेले २ दिवस ज्ञानेश कुमार हे गप्प झालेत आणि त्यांना बोलते करणारे पण कुठेच दिसत नाहीत. ज्ञानेश कुमार यांच्यासारख्यांना हाताशी धरून आपण कसे सत्तेचा अमरपट्टा घेऊन आलोत हे भारतीय जनता पक्ष सांगत होते हे लक्षात आले असेल. त्यासाठी त्यांनी २०२५ पासून एसआयआर हे नवे अस्त्र हाती घेतले आहे,'' असे म्हणत राज ठाकरेंनी पुन्हा एकदा ज्ञानेश कुमार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

एसआयआरमध्ये काय घोळ झालेत आणि यावर निवडणूक आयुक्तच बोलत आहेत हे बघितल्यावर, एकच पर्याय दिसतो तो म्हणजे ही एसआयआरची संपूर्ण प्रक्रियाच रद्द केली गेली पाहिजे. त्यासाठी देशातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्र यायला हवे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ही मागणीच आहे की आत्ता झालेलं एसआयर पूर्ण रद्द करा, त्यात कसे घोळ झाले याची निष्पक्ष चौकशी करा आणि नव्याने ही प्रक्रिया करा, अशी मागणी देखील राज ठाकरेंनी केली आहे. तसेच , यापुढे सर्व निवडणुका व्होटिंग मशिनवर न घेता पुन्हा बॅलेट पेपरवरच घेण्यासाठी सर्व पक्षांनी एकत्र येऊन मोठे आंदोलन उभे केलं पाहिजे, तरच इतक्या वर्षांच सत्तेचे सत्य बाहेर येईल, असेही राज यांनी म्हटले. दरम्यान, राज ठाकरेंनी काल देखील निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरुन जोरदार टीका केली होती. दरम्यान, राहुल गांधी यांनी देखील पत्रकार परिषद घेऊन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि मोदी सरकारवर अत्यंत गंभीर आरोप केले. राहुल गांधी यांनी ''लोकशाहीचा विनाश करणारा'' आणि ''देशद्रोह करणारा'' असे म्हणत निवडणूक आयोगावर घणाघाती हल्ला चढवला. तसेच, भारतीय राजकारणात सत्ताविरोधी लाट ही एक मोठी वस्तुस्थिती आहे. मग भाजपविरोधात जनता नाराज असतानाही प्रत्येक निवडणुकीत भाजपच कसा जिंकतो? असा सवालही राहुल गांधी यांनी केला.

**निवडणूक आयोगाची विश्वासार्हता धोक्यात?** निवडणूक आयोगातील अंतर्गत मतभेदाची बातमी समोर आल्यानंतर, २४ सप्टेंबर रोजी लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक धडाकेबाज पत्रकार परिषद घेऊन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि मोदी सरकारवर अत्यंत गंभीर आरोप केले. राहुल गांधी यांनी थेट निवडणूक आयोगावर ''लोकशाहीचा विनाश करणारा'' आणि ''देशद्रोह करणारा'' असा घणाघाती हल्ला चढवला आहे. राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत पीपीटी सादर करत भाजपच्या विजय आणि निवडणूक आयोगाच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित केले. भारतीय राजकारणात सत्ताविरोधी लाट ही एक मोठी वस्तुस्थिती आहे. मग भाजपविरोधात जनता नाराज असतानाही प्रत्येक निवडणुकीत भाजपच कसा जिंकतो? असा सवाल राहुल गांधी यांनी केला.

निवडणूक आयोगातील इतर दोन आयुक्तांनी ज्ञानेश कुमार यांच्या निर्णयांवर १४ वेळा तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. हाच देशात 'वोट चोरी' झाल्याचा सर्वात मोठा पुरावा आहे, असा दावा राहुल गांधी यांनी केला. ज्ञानेश कुमार हे पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या सांगण्यावरून काम करत आहेत. त्यांनी संविधानावर आणि देशावर हल्ला केला आहे. त्यामुळे त्यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. काँग्रेस आणि 'इंडिया' आघाडीच्या इतर मित्रपक्षांनी आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात संसदेत महाभियोग प्रस्ताव आणण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. कायदेतज्ज्ञांच्या मदतीने महाभियोगाच्या मसुद्याची तयारी सुरू आहे. आगामी १ ते २ आठवड्यांत लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही सदनांमध्ये ही नोटीस सादर केली जाण्याची शक्यता आहे. महाभियोग प्रस्ताव आणण्यासाठी लोकसभेत किमान १०० खासदार आणि राज्यसभेत ५० खासदारांच्या सह्यांची आवश्यकता असते. नोटीस स्वीकारल्यानंतर चौकशी समिती गठीत केली जाते आणि त्यानंतर दोन्ही सदनांमध्ये २/३ बहुमताने प्रस्ताव मंजूर व्हावा लागतो.

Dr.Rahim H.Khan
B.A.M.S., M.D.
Cell : 9890882182, 9373757674
Mughal
Ayurvedic Clinic
Near harsool water tank,
jatwada road Chatrapati
Sambhajinagar-431001
Time: 8.00 pm to 11.00 pm
Sunday Closed

# हिमायतबाग गट नं.२२ जमीन प्रकरणी काय गडबड आहे!

## नवाब झुल्फेखर जहाँ बहादूरचा मालकी हक्क आणि अधिकारावर प्रश्न?

**छत्रपती संभाजीनगर (दैनिक लोकनिष्ठ)** – शहरात प्लॉट किंवा जमीन खरेदी करण्यापूर्वी कागदपत्रांची तपासणी न केल्यास मोठा आर्थिक फटका बसू शकतो .खोटी रजिस्ट्री, बनावट जीपीए (मुखत्यारनामा) आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे जमीन हडपण्याचे प्रकार समोर येत आहे. अशा बोगस प्रकरणामध्ये पोलिसांनी खोट्या व्यवहारांबाबत कारवाही सुरु केली असून आता पर्यंत अनेक गुन्हे नोंद झाले आहे काही प्रकरणांमध्ये चौकशी हि सुरु आहे. हिमायतबाग जमीन प्रकरणी आरोपप्रत्यारोप होत असतांना आता प्रकारांची सखोल चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे.

शहरातील हिमायतबाग जागेबाबत परिसरातील काही नागरिकांनी जमीन व्यवहारांबाबत शंका निर्माण केली आहे ज्यामुळे हिमायतबाग गट न.२२ मधील ७ एकर २ गुंठे जमिनीबाबत वादविवाद व प्रकरणांमध्ये संशय वाढत चालला आहे. मूळ जमीन मालकाचा व त्यांच्या वारसदारांच्या बाबतीत जी माहिती समोर येत आहे त्यामुळे हि ७ एकर २ गुंठे जमीन वादांकित होत चालली आहे. खरेदीखत आणि जीपीए आधारे व्यवहार संशयास्पद असल्याचे सांगितले जात असले तरी महसूल विभागातील अधिकारी या प्रकरणाला मार्गी लावण्यासाठी प्रत्यनशील असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

जमीन किंवा प्लॉट खरेदीकरताना केवळ मालकाने दाखविलेल्या कागदपत्रांवर विश्वास न ठेवता जमिनीचा मालकी हक्क, पूर्वीचे व्यवहार जमिनीचा ताबा, संबंधित कागदपत्रांची अधिकृत पडताळणी करूनच व्यवहार करणे आवशयक असते पण हिमायतबाग गट न.२२ प्रकरणी महसुली अभिलेखात व कागदपत्रांमध्ये जमिनीचे मूळ मालक मीर उस्मान अली खान ७वे निजाम हे असल्याचे दिसून येत नाही किंवा त्यांचे वारासदारांचे हि नोंदी दिसून येत नाही अशी खात्रीलायक माहिती मिळाली आहे. कोट्यवधी रुपयांची हिमायतबाग जमीन महसूल विभागाच्या आशीर्वादाने कायदेशीररित्या मार्गी लावण्याचे खेळ सध्या जोरात सुरु आहे. महसुल विभागात प्रकरणातील माहिती उघड न करता अपर तहसीलदार कार्यालय आणि उप विभागीय अधिकारी कार्यालयाकडून माहिती अर्ज दाखल केल्यानंतर ही लपविले हि जात आहे.




सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी कि नवाब मीर उस्मान अली खान ७वे निजाम यांचे दिनांक २४/२/१९६७ रोजी निधन झाले आहे आणि नवाब झुल्फेखर जहाँ बहादूर (मकाई दरवाजा गोलकुडा, हैदराबाद) यांचे दिनांक २६/६/१९९७ निधन झाले.निजामाचे वारस असल्याबाबत निज़ाम अतियात किंवा हैदराबाद निजाम वंशावळ प्रकरणाचे आदेश याबाबत हि स्पष्ट भूमिका मंडळी गेली पाहिजे. हिमायतबाग गट न.२२ क्षेत्र ७ एकर २ गुंठे जमिनबाबत १९९० च्या प्रकरणाचा उल्लेख केले जात आहे त्याबाबत स्पष्टता नसल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. निजाम मिळकतीचे खरेदीखत मुखत्यारआम ज्याचा आधार सांगितले जाते ते नवाब झुल्फेखर जहाँ बहादूर यांच्या वारसाहक्का बाबत हि आक्षेप नोंदविले जात आहे.सिराजुद्दीन शरीफउद्दीन नागोरी,अमीर खॅ महंमद खा पठाण हकीम महंमद सलीम हकीम मजालउद्दीन, सिराजुद्दीन शरीफउद्दीन नागोरी व इतर मार्फत मुखत्यारआम म्हणून दलाल मोहम्मद अरसलान मो. अल्ताफ व इतर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ फळ संशोधन केंद्र,सतीश भागचंद सेठी आणि ग्राम महसूल अधिकारी छत्रपती संभाजीनगर हिमायतबाग जमीन प्रकरणमध्ये अर्जदार आणि गैरअर्जदार असून प्रकरणात अधिक गुंतागुंती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. हिमायतबाग प्रकरणात अधिकाऱ्यांवर भूमाफियांशी संगनमत करून खाजगी मालमत्ता म्हणून घोषित केले जाणार असल्याचे आरोप केले जात आहे.

हिमायतबाग गट न. २२ ची जमीन १९९० पासून च्या खरेदीखत आणि मुखत्यारआम च्या आधारे मालकीहक्काचे दावे करून मालकीहक्काआधारे सातबारा मध्ये नाव नोंदविण्याचे आहे. हे दावे आणि वास्तुरीस्थिती जाणून घेण्यासाठी संबंधितांना कागदपत्रांची मागणी केली असल्यावरही या विभागांकडून कागदपत्र देण्यास टाळेटाळ केले जाते.महाराष्ट्रातील निजामाच्या काही जमिनी जिल्हास्तरावर कार्रवाहीकरत जिल्हा प्रशासन आणि शासनाने जप्त हि केलेली आहे अशी अनेक आदेश पारित झालेले आहे.हिमायतबाग जमीनमध्ये मालकीहक्काचा दावा करणाऱ्यांच्या नावे जमीन हस्तांतरित करण्याचा नवाब झुल्फेखर जहाँ बहादूरला कोणताही हक्क आणि वैध मालकी नाही असे असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.आता प्रकरणी अपर तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्याकडील प्रकरणात कर्तव्यनिष्ठ अधिकारी काय भूमिका घेणार व काय निर्णय देतील याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.



9370987123/9860643044

Deccan Darbar
Restaurant & Cafe
Indian I Mughlai I Chinese I Arabic Special



Kausar Baugh, NIBM Kondhwa, Pune - 48. ddarbarpune@gmail.com

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **युनूस खान** यांनी माइलस्टोन मिडिया, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय लोकनिष्ठ, ६१ जीएम प्लाझा, आरटीओ ऑफीसच्या बाजुला, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. संपादक : **युनूस खान**, मो. क्र. **9890190231**, RNI - MAHMAR/2023/87332